# आनंदाची पूर्वतयारी





'टाळी वाजवली की वस्तू हजर' असं नशीब असलेल्या आजच्या मुलांना हे माहीत नसतं की, ही वस्तू 'हजर' करण्यासाठी आई-बाबांनी कुठला आटापिटा केलाय! त्यांना वाटतं, नोटा आपोआप पर्समध्येच जन्माला येतात. एकदा काही नोटा काढल्या की, मग उरलेल्या नोटा बाळंत होतात. मग एखादी गोष्ट 'महाग आहे' म्हणून आई-बाबा का नाकारतात, त्यांना कळतच नाही. यातून वस्तूंची तर जाऊच द्या, पण क्षणांचीच किंमत त्यांना कळत नाही.

आज एका वर्षात पुस्तकाचे दोन सेट वापरणारी अनेक मुलं आहेत. कंपास तर किती लागतात, याचं गणितच नाही. जो ड्यांचे अनेक जोड कपड्यांच्या डौलाप्रमाणे पायाशी सज्ज असतात. 'आहे त्यांच्या नशिबात, म्हणून देतो,' असं म्हणणाऱ्या लक्ष्मीवंत पालकांना या वृत्तीबद्दल 'ठणकावणारे' ज्येष्ठ लोक विघ्नसंतोषी वाटतात. 'आम्हाला तुम्ही कुठे दिलंत असं सुखी बालपण? तुमच्या २२० रुपये पगारात आमच्या फिया थकायच्या. एकच खाकी चड्डी पुनः पुन्हा वापरली. मागे फाटली, तर परिस्थितीचं ठिगळ आमच्या पार्श्वभागी चिकटवलंत,' असं आई-वडिलांनाच सुनावणारे पैसा आणि तारुण्य यामुळे मगरमस्तीत असणारे पालक मी घराघरात पाहतो. अशावेळी वेळच्या वेळी गोष्टी न मिळण्याचं अभावातलं सुख आणि त्या व्याकुळतेनंतर कल्पद्रुमाप्रमाणे अवचित मिळणारं समाधान याची लज्जत ज्यांनी चाखलीय त्यांनाच हे म्हणणं पटू शकेल.

ज्यावेळी समाजात आपोआपच सहकार्याचा संस्कार होता, एकमेकाला मदत करणं म्हणजे फार काही मोठी बाजी मारतोय-याचा मागमूस नसायचा, अडल्या-नडल्या वेळी चटकन् हात देता येणं भाग्य वाटायचं- असा मोठा मजेचा काळ मधल्या पि ढीनं अनुभवला आहे. आणि हे सगळं सोसताना जे आपण मिळवलं, ते आपल्या मुलांना मिळत नाही, वस्तू-रूपातलं सगळं मिळतं, त्यापलीकडचं मिळत नाही, हीच एक खंत अनेकांच्या मनाला व्यापून आहे. अशावेळी कुणीतरी मनातलं बोलतं आणि तिथं जीव जडला जातो. वाचतानाही अनेकजण डोळे मिटून २०-२५ वर्षांपूर्वीचा काळ फिरून येईल आणि प्रत्येकाच्या आयुष्यातल्या त्या एकाकी क्षणी कोण, कसा सांगाती झाला, ते आठवून डोळ्यांना धारा लागतील...

वडिलांना जो काही पगार जेमतेम मिळायचा तोही सलग तीन महिने कार्यालयीन कागदपत्राअभावी न मिळालेले



औरंगाबादेतले दिवस समोर येतात. बेगमपुऱ्यातलं ते दीडखणी घर. सगळे नातेवाईक दूर आणि अगदी अनोळखी गाव. घरातल्या धान्याचा कणन् कण संपून खडखडाट कसा होतो, तो ऐकायला यायचा न् भूक अजूनच भुकेली व्हायची. तेलाअभावी निरांजन न उजळलेल्या देव्हाऱ्यात आम्हा मुलांना दोन्ही बाजूला बसवून 'तुझी वस्ती गे कडापी, तेथून रक्षण करीसी, जय जय जय अंबे' ही आरती आई आळवीत असायची. पण आईचं त्यावेळीही लक्ष असायचं- 'आज तरी पगारासह वडील घरी येतील का?' याकडे! अशावेळी एखाद्याच्या मनात सहज करुणा निर्माण होते. तोच साक्षात्कार म्हणायचा का? परमेश्वर धावून येतो म्हणजे काय, हे सिद्ध करायची धडपड करण्यापेक्षा अनुभूती महत्त्वाची. पण 'तो' आपल्यासाठी कुणाच्या तरी मनात या ना त्या रूपात निर्माण होतोच. सश्रद्धासाठी आणि अश्रद्धासाठीही! कारण 'तो' कुणावर रागावून फुरंगटण्याइतका संकुचित नसतो. अश्रू आणि हासू हे त्याचेच विभ्रम! या दोन्हींचीही प्रचीती घडत्या वळणावरच यावी लागते. एकच क्षण- फक्त एकच क्षण असतो, की तुमच्या सर्व सात्त्विकतेची परमोच्च कसोटी लागते. तिथं तुम्ही लाचार न होता कणखरपणे उत्तीर्ण झालात की मग दृश्यच बदलते. परीक्षांचेही रूपरंग बदलतात.

कुणाकडेही उसनं मागायचं नाही, हा निश्चय केलेल्या आईची अशी कसोटी पाहिली नियतीनं! आता वाढणार काय मुलांना? तेवढ्यात समोर राहणारी शेतकरी कुटुंबातली शेजारीण आली आणि म्हणाली, 'सकाळीच गावाहून जवारीचं पोतं आलंय. गावच्या जवारीचं पीठ बघा तरी, चव येगळीच असते.' त्या सत्त्वपरीक्षेच्या संध्याकाळी 'गावच्या ज्वारीची चव' चाखण्याचा आग्रह तिला का करावासा वाटला? रतिबाचं दूध, साखरेविनाच त्यात कुस्करलेली भाकरी- यावर गेलेल्या दोन रात्री! आणि त्यानंतरच्या दिवशी पिशवी भरून भाजी, खाऊ, पेढे घेऊन आलेले वडील! पगाराचं पाकीट आईच्या हाती देताना दोघांचे ओलावलेले डोळे... यांनी मला काहीच दिलं नसेल का? अशा परीक्षांचा जडणघडणीत वाटा नसतो का?

आज एखाद्या खेळण्याची, वस्तूची, रेडीमेड कपड्याची किंमत पाहून मुलगा म्हणतो, 'फक्त सातशेच तर आहेत ना?

माझ्या मित्राकडे अकराशेचं आहे. हे स्वस्तच आहे, घेऊन टाका.' अशी आज्ञा देताना त्याला संकोच वाटत नाही. रुपयांच्या किमतीबरोबर आनंदाचीही किंमत घसरत चाललीय याचं वाईट वाटतं. कुणी म्हणेल, काळ बदललाय, किती जुन्यात रमताय? पुढे चला. आता हे असंच चालायचं! हे जुन्यात रमणं नाही. वस्तू हाती लागते, पण त्यानिमित्तानं आतून उमलणाऱ्या आनंदाला ती पारखी होतायत, याची खंत वाटते. आत्यंतिक गरजेच्या वेळी कोण उभं ठाकणार? अशा काळानेच आपल्याला ठाम उभं केलेलं असतं. डब्यातून मिळणाऱ्या कुठल्याही बाह्य जीवनसत्त्वाचे चमचे दुधातून विरघळवून देणारे आजचे पालक परिस्थितीनं दिलेलं, अंतःकरणातूनच उसळणारं जीवनसत्त्व आपल्या मुलांना आज कसं देत असतील? सगळं हाताशी, हात जोडून देण्यासाठी सज्ज असलेल्या पालकांची मुलांबाबतची धडपड त्याच हाताने उलटा तर परिणाम साधणार नाही ना?

यशाचे आणि कागदी गुणवत्तेचेही पॅटर्न तयार झालेल्या आजच्या पोपटपंची काळात परिस्थितीचा हा दहा दिशांचा अभ्यासवर्ग हरवला. बी. कॉम. प्रथम वर्गात उत्तीर्ण झालेला मुलगा बँकेत चेक भरू शकतोच असं नाही. कुठलाही रेडीमेड कॅल्क्युलेटर हाती नसलेली निरक्षर भाजीवाली चटकन् बेरीज-वजाबाकी करून उरलेले पैसे परत करते अन् आपण मनात गणितच करीत थांबलेलो असतो. एकाच मेथीच्या जुडीचे तीन प्रकार करून तीन जेवणवेळा साजरी करणारी गृहिणी प्रतिकुलतेच्या दिंडी-दरवाजातून इथवर आलेली असते. त्याचवेळी फ्रीजमध्येही थंड पडून नासल्यात जमा झालेली जुडी प्लॅस्टिकच्या पिशवीतून अलगद कचऱ्याच्या डब्यात सरकवताना एखादीला हळहळ वाटत नाही. एक काय कमावते अन् एक काय गमावते, हे सिद्ध नाही करता येणार. भुकेआधीच अन्न पोटात पडत राहतं, तेव्हा त्या अन्नाला तरी चव काय राहणार?

आर्थिक दुःस्थितीने पिचून गेलेल्या कित्येक युवकांची पत्रं येतात. एकाच वेळी आपली वादळवाट मांडणारी न् त्याचवेळी 'एकच तारा समोर, आणिक पायतळी अंगार' असा निश्चय सुचविणारी! वाचता वाचता अश्रूही रंग बदलत जातात. दयेचे अश्रू कौतुकाचे रंग परिधान करतात. खरं तर पुढल्या काळात तीच मुलं घडतील- ज्यांनी परिस्थिती जाणून भरारी घेतलीय. आत्यंतिक उपलब्धतेनं थुलथुलीत झालेली मऊ मुलं संग्रामात उभी कशी राहणार? ज्यांना आई-बाबांच्या कृपेने सर्व लाभलंय त्यांनीही- हे 'आपलं' नाही, आपलं आकाश जिद्दीनं उभारायचंय, या जिद्दीनेच कामाला लागायला हवं. अशातून घडलेल्या माणसाच्या जीवनाला एक न्याराच सुवास असतो.

एका शिक्षकाने सांगितलेला प्रसंग आठवतो. सर्वात गरीब मुलांची त्या शाळेनं सहल काढली. अहमदनगर जिल्ह्यामधल्या छोट्या खेड्यातून 'मंबई' पाह्यला आलेल्या त्या मुलांचा खर्च सात-आठ शिक्षकांनीच विभागून घेतला होता. 'लिफ्ट' शब्द धड्यात आला तर 'लिफ्ट म्हणजे काय?' असं मुलं विचारायची, तर त्यांना समजवायचं कसं? समुद्र कसा असतो, हे दाखविल्याशिवाय त्यांना कसं कळणार? लोकल दोन्ही बाजूंनी चालते कशी? न् खरंच छप्पन्न मजली इमारती असतात का? मुलांच्या या निरागस प्रश्नांना त्या झपाटलेल्या शिक्षकांनीच उत्तर दिलं. त्यांनी आपणच खर्च करून जमेल तितक्या कमी खर्चात मुंबई दाखवायची आपल्या विद्यार्थ्यांना, हे ठरवलं. हेतू निर्मळ असला की नियतीच निरांजन घेऊन वाट दाखवते. मुंबई गोदीत बंदर दाखवायला मुलं आणली. एक-दीडच्या सुमारास त्या भुकेल्या मुलांना तिथल्याच कॅन्टीनमधले मिसळ-पाव खिलवले. रानवाऱ्यातली मुलांची भूकही व्यवस्थित. बिलही डोळे फिरवणारंच झालं. शिक्षक शिल्लक पैसे घेऊन काऊन्टरवर गेले, तर धक्काच! बिल आधीच भरलेलं. कुणी दिलं बिल?

त्या समोरच्या हमालानं! विचारल्यावर तो हमाल म्हणाला- 'एका मुलाकडे चौकशी केल्यावर कळलं, माझ्याच गावाकडनं ही शाळा आलेय. म्हटलं, आम्ही नाही शिकलो, पण गावाची सेवा करायची छोटीशी संधी आहे. मी काही विशेष नाही केलं. केलं, ते मला बरं वाटण्यासाठीच!'

आता समुद्राची खारी लाट डोळ्यात होती. रोषणाईनं, ढोल-नगाऱ्यानं श्रीमंतीचा देखावा रचता येतो, पण खरी श्रीमंती बहरते ती अशा न दिसणाऱ्या, पण समाजातल्या जिद्दी मनांसाठी आपली ओंजळ खुली करणाऱ्या हातांमधूनच! शिक्षकांची काय, पालकांची काय, आणि मुख्य म्हणजे नव्या जीवनात पाऊल टाकणाऱ्या विद्यार्थ्यांची काय, कोलंबसाच्या निधड्या छातीची जिद्द हवी! आयुष्याचं मोल पुरेपूर कळलेलं असायला हवं. रडत- कुढत बसू, तर सडतच राहू कोपऱ्यात. त्यापेक्षा निर्धाराने झेप घेऊ- ही कर्तव्यकठोरता हवी.

सध्या परीक्षांचे दिवस आहेत. पण परीक्षांचे दिवस आयुष्यभर सुरूच असतात. 'या' परीक्षेतूनच 'त्या' परीक्षेकडे निघायचे असते. केवळ मजकुराचे पाठांतर आणि कागदी सोल्युशनच्या मलमपट्ट्यांनी जीवनातली कोडी सुटत नाहीत. त्यासाठी रणांगणातच उतरायचे असते. कधी यशाचे, तर कधी अनपेक्षित अपयशाचेही पंख करून निघायचे असते. त्यासाठीच वर्तमानात जागरूकता हवी. आताची प्रतिकूलता हीच आनंदाची पूर्वतयारी असते. आताचा आळस, दिरंगाई, प्रसारमाध्यमांसकट क्रिकेटचे आंधळे वेड, सुखाच्या 'फिल्मी' कल्पना, निराश, दुबळ्या मित्रांची कुसंगत ही दुःखाची पूर्वतयारी असते. आपल्याला अतीव, निर्मळ आनंदाचीच पूर्वतयारी करायची आहे.

जीवनाच्या त्या परीक्षेत कॉपी करता येत नाही. कारण तेथे मुळी पर्यवेक्षक नामक गुरखाच नसतो. आपणच आपल्यावर कडेकोट सुपरव्हिजन करायची असते. कर्तव्यकठोरतेने! ध्यासातील सूक्ष्मतेने!